शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

मुंबई ● रविवार, २८ जून २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक २६० ● पाने १४ (कोलाजसह) ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

अकरावीचे निम्मे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित!

पान : मुंबई

फ्रान्स, बेल्जियम, स्पेन, इजिप्त, काबो वर्देची बाद फेरीत धडक!

पान : क्रीडा

'नीट' पाठोपाठ टीईटीलाही पेपरफुटीचे ग्रहण!

राज्यातील सव्वाचार लाख उमेदवारांचे शिक्षक होण्याचे स्वप्न पुन्हा अधांतरी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

'नीट' परीक्षेतील पेपरफुटीमुळे संपूर्ण देश ढवळून निघालेला असतानाच, महाराष्ट्राला पुन्हा एकदा पेपरफुटीचे ग्रहण लागले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवारी (२८ जून) राज्यभरात आयोजित करण्यात आलेल्या 'शिक्षक पात्रता परीक्षा २०२६' (टीईटी) चा पेपर फुटल्याचा प्रकार शनिवारी उघडकीस आला. या प्रकरणाचे 'भिवंडी कनेक्शन' समोर आले असून, पोलिसांनी पहाटेच धाड टाकून तिघा संशयितांना बेड्या ठोकल्या आहेत. ठाणे-भिवंडी परिसरात प्रश्नपत्रिका लीक झाल्याची माहिती समोर आल्यानंतर परीक्षा तातडीने पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याने, शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सव्वाचार लाख उमेदवारांना याचा फटका बसला आहे.



'नीट' परीक्षेतील गैरप्रकारात महाराष्ट्रातील धागेदोरे समोर आल्यानंतर राज्य परीक्षा परिषदेने 'टीईटी'साठी अत्यंत काटेकोर नियोजन केल्याचे दावे केले होते. मात्र, हे सर्व दावे फोल ठरले आहेत. शनिवारी (२७ जून) पहाटेच्या सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी एका संशयास्पद ठिकाणावर छापा टाकला. तेथे काही व्यक्तींकडे टीईटीच्या प्रश्नपत्रिकेचे साहित्य आढळून आले. पोलिसांनी परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना भिवंडीत पाचारण केले. अधिकृत प्रश्नपत्रिका व जप्त केलेल्या साहित्याची पडताळणी केली असता, त्यातील अनेक प्रश्न तंतोतंत समान असल्याचे आढळून आले. या प्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

या परीक्षेसाठी राज्यभरातून ४ लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी नोंदणी केली होती. यामध्ये 'पेपर एक' व 'पेपर दोन' मिळून ६ लाख १२५ अर्ज आले होते. नोंदणी केलेल्या उमेदवारांपैकी २ लाख २६ हजार २६३ (सुमारे ४४ टक्के) हे आधीच विविध शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक आहेत. संपूर्ण राज्यातील १ हजार २८ केंद्रांवर रविवारी ही परीक्षा होणार होती. याविषयी स्पष्टीकरण देताना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून सांगण्यात आले की, 'कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पूर्ण पारदर्शकपणेच व्हावी हा परीक्षा परिषदेचा आग्रह आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याने २८ जूनची परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. परीक्षेच्या पुढील तारखेबाबतची अद्ययावत माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल," असेही स्पष्ट करण्यात आले.

याआधीही फुटले 'टीईटी'चे पेपर

टीईटी परीक्षेत गैरप्रकार घडण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही या परीक्षेला भ्रष्टाचाराचे मोठे ग्रहण लागले होते. २०१८ च्या टीईटी परीक्षेत १ हजार ६६३ उमेदवारांनी गैरप्रकार केल्याचे सिद्ध झाले होते. २०१९ च्या परीक्षेत तब्बल ७ हजार ८७४ उमेदवारांचा गैरप्रकारात थेट सहभाग उघड झाला होता. या दोन्ही परीक्षांमधील ९ हजारांहून अधिक बोगस उमेदवारांचा निकाल रद्द करून कारवाई केली होती. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या टीईटी परीक्षेत कोल्हापूरच्या मुरगुड पोलीस ठाण्यात गैरप्रकाराचा गुन्हा दाखल झाला होता, ज्यामध्ये २२ उमेदवारांवर दंडात्मक कारवाई करत त्यांचा निकाल रद्द करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल

हजारो केंद्रांवर परीक्षेची पूर्ण तयारी झालेली असताना अचानक परीक्षा रद्द झाल्याने ६ लाखांहून अधिक उमेदवारांना मोठा फटका बसला आहे. दूरवरून प्रवासाचे नियोजन केलेल्या विद्यार्थ्यांचे यामुळे हाल झाले आहेत. परीक्षा परिषदेने दिलेल्या माहितीनुसार, टीईटी परीक्षेबाबतची सर्व अद्ययावत माहिती व पुढील तारीख महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. विद्यार्थ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत नोटिफिकेशनकडे लक्ष ठेवावे.

भिवंडीतून प्रश्नपत्रिका लीक; तिघांना अटक

टीईटी पेपरफुटीने महाराष्ट्र हादरला

दोषींवर कारवाई करण्याची घोषणा



"पेपर फुटीनंतर ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. फेरपरीक्षा कधी होणार आहे, याचे नियोजन लवकरच कळवू. अशा प्रकारची परीक्षा घेण्यासाठी तीन आठवड्यांची प्रक्रिया असते. फेर परीक्षेसाठी उमेदवारांना पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. किंबहुना त्यांच्याकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. येत्या २ ते ३ दिवसांनी टीईटी परीक्षेची नवीन तारीख घोषित केली जाईल.

- प्रिया शिंदे, उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

"विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी परीक्षा त्वरित पुढे ढकलण्यात आली असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या लोकांनी परीक्षेत गैरप्रकार करून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांची पाळेमुळे खणून काढून या गैरप्रकारांमध्ये सामील असलेल्या दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

सहारा विमानतळ परिसरात अटक

१ भिवंडीतून टीईटी परीक्षेचा पेपर फुटला. कोनगाव येथील डायमंड हॉटेलमध्ये पेपरफुटी प्रकरणातील संशयित थांबले असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कोनगाव पोलिसांचे पथक हॉटेलमध्ये दाखल झाले.

२ पोलिस पोहोचण्यापूर्वीच संशयित तेथून पसार झाले होते. यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत सहारा विमानतळ परिसरातून तिघा संशयितांना ताब्यात घेतले.

३ ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना पुढील चौकशीसाठी भिवंडीत आणले आहे.

टीईटीच्या प्रश्नपत्रिकेसाठी दीड कोटी रुपयांची मागणी

टीईटी परीक्षा होण्याच्या काही तासांपूर्वीच मिळालेल्या गोपनीय माहितीमुळे संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली. टीईटी परीक्षेचा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, याची माहिती देण्यासाठी भिवंडी येथे अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले की, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते.

गृह युद्धामुळे सुदान नरसंहाराच्या उंबरठ्यावर!

७२ तासांत मोठ्या हल्ल्याची शक्यता

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

सुदानमधील गृह युद्ध आणखी भीषण वळणावर पोहोचले आहे. रॅपिड सपोर्ट फोर्सेज (आरएसएफ)ने उत्तर कोर्दोफान प्रांतातील अल ओबेद या महत्त्वाच्या शहराला तिन्ही बाजूने वेढा दिला आहे. त्यामुळे सूदानमध्ये नरसंहाराचे संकट ओढवण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिका, ब्रिटनसह अनेक पाश्चिमात्य देशांनी याबाबत गंभीर इशारा दिला आहे.

५ लाख लोकसंख्या असलेल्या अल ओबेद शहराभोवती बंडखोर संघटना रॅपिड सपोर्ट फोर्सेज (आरएसएफ) व त्यांच्या सहकारी गटांनी सैन्य जमवले आहे. या शहरावर हल्ला होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून काही आठवड्यांपासून ड्रोन हल्ले व मिसाइल हल्ल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली व इतर युरोपीय देशांनीही संयुक्त निवेदन जारी करून आरएसएफला हल्ला थांबवण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांना सुरक्षित मार्ग व मदत संस्थांना अडथळ्याविना काम करण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे. सुदानमध्ये एप्रिल २०२३ पासून गृह युद्धामुळे लाखो लोक विस्थापित झाले आहेत. पुढील ७२ तासांत एक हल्ला होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

संयुक्त राष्ट्र, अमेरिकेचे आजवर केवळ इशारेच

१ सुदानमधील संकट हे जगातील सर्वात मोठे विस्थापनाचे संकट आहे. तरीही त्याला केवळ एक टक्का प्रसिद्धी मिळते. इतर संघर्षांच्या तुलनेत याला मिळणारी प्रसिद्धी कमी आहे.

२ संयुक्त राष्ट्र आणि अमेरिका इशारे देत आहेत, परंतु ठोस कारवाई करत नाही. जर अल ओबेदमध्ये नरसंहार झाला तर ते थांबवणे कठीण होईल.

पंतप्रधान मोदींनी घेतली १९४ वर्षांच्या 'जोनाथन'ची भेट

◆ व्हिक्टोरिया (वृत्तसंस्था):

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी सेशेल्सच्या तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. हिंदी महासागरात असलेल्या असलेल्या सेशेल्सला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होत आहेत. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सेशेल्स दौऱ्यात जगातील सर्वाधिक वृद्ध सजीव अशी ओळख असलेल्या 'जोनाथन'ची भेट घेतली. जोनाथन एल्डाब्रा जायंट कासव आहे. त्याचे वय १९४ वर्षे इतके आहे. जोनाथन सध्या सेशेल्सच्या राजधानीतील जेम्सटाऊन येथील नॅशनल बोटॅनिकल गार्डनमध्ये वास्तव्यास आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सनुसार, जोनाथन जगातील सर्वांत वयाचा जमिनीवर राहणारा सजीव आहे. जोनाथनच्या प्रजातीची कासवं सरासरी १५० वर्षे जगतात. पण जोनाथन त्यापेक्षा अधिक जगला आहे.



पंतप्रधान मोदी यांनी सेशेल्स दौऱ्यादरम्यान नॅशनल बोटॅनिकल गार्डनला भेट दिली. तिथे त्यांनी जोनाथनची भेट घेतली. त्याला झाडाची पाने खाऊ घातली. पर्यावरण संरक्षणाच्या संदेश देण्यासाठी मोदींनी बोटॅनिकल गार्डनला भेट दिली. हिंदी महासागरातील सेशेल्स देशाला २९ जून १९७६ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्याआधी हा देश ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. सेशेल्सच्या स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण होत आहेत.

विमानपेक्षा 'इमान' महत्त्वाचे!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

◆ मुंबई (प्रतिनिधी):

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलेल्या एकत्र विमान प्रवासामुळे तर्कवितर्क लढवले जात असतानाच, आता या प्रवासावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोचक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. 'विमान प्रवासापेक्षा राजकीय जीवनात 'इमान' राखणे जास्त महत्त्वाचे असते,' अशा शब्दांत शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले. २०१९ मध्ये जनतेने शिवसेना-भाजपला एकत्र प्रवासाचे तिकीट दिले होते, पण उद्धव ठाकरेंनी काँग्रेसच्या बुडत्या जहाजात उडी घेतली, असा टोलाही त्यांनी लगावला.

शुक्रवारी मुंबईहून नागपूरला जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी एकाच विमानातून प्रवास केला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'आपण भेटलो हीच मोठी बातमी' असा मिश्किल टोला लगावला होता, तर उद्धव ठाकरे यांनी 'आमची विमानात उच्चस्तरीय चर्चा झाली,' अशी प्रतिक्रिया दिली होती. ठाकरेंच्या या दाव्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगलाच समाचार घेतला. '२०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने त्यांना (उद्धव ठाकरे) महायुतीच्या माध्यमातून एकाच विमानातून प्रवास करण्याचे तिकीट दिले होते. परंतु, जनादेशाचा अनादर करत त्यांनी काँग्रेसच्या बुडत्या जहाजातून प्रवास सुरू केला. आता त्या जहाजात ते पुरते गटांगळ्या खात सुटले आहेत. त्यामुळेच आता पुन्हा एकदा अशा प्रकारचे केविलवाणे प्रयत्न सुरू आहेत,' असे शिंदे म्हणाले.

देवेंद्रजी हुशार आणि परिपक्व

शिंदे म्हणाले, 'देवेंद्रजी अत्यंत हुशार आणि परिपक्व नेते आहेत. २०१९ मध्ये एक कपटी मित्र किती घातक असू शकतो, याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला आहे. त्यामुळे कोण काय चाल खेळतेय, हे त्यांना चांगले ठाऊक आहे. खरं म्हणजे एक म्हण आहे, वराती मागून घोडे. सगळे खासदार गेल्यावर आता हे तिथे पोहोचत आहेत. त्याचा काय उपयोग आहे? 'जो बुंद से गई वह हौद से नही आती है,' अशा शब्दात त्यांनी ठाकरेंना सुनावले आहे.

हिंदूकुश पुन्हा हादरला; भूकंपाने आठ देशांत थरकाप

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

अफगाणिस्तानात झालेल्या खोल केंद्राच्या तीव्र भूकंपाचे हादरे पाकिस्तान, उत्तर भारत, मध्य आशियामध्ये जाणवले. शनिवारी सायंकाळी अफगाणिस्तानच्या हिंदूकुश भागात ६.२ रिश्टर स्केल क्षमतेचा भूकंप झाला. हा भूकंप भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७.०४ वाजता २१५ किलोमीटर खोलीवर झाला. याचे हादरे पाकिस्तान व उत्तर-पश्चिम भारताच्या काही भागांत जाणवले.

या भूकंपाचा केंद्रबिंदू ईशान्य अफगाणिस्तानमधील कलाफगनपासून ८१ किमी अंतरावर होता. याचे हादरे अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, चीन, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, किर्गिस्तान व तुर्कमेनिस्तानमध्ये जाणवले. भूकंपाचे केंद्र जमिनीखाली खूप खोलवर असल्याने हे हादरे मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर जाणवले.

भूकंपामुळे पाकिस्तानच्या उत्तरेकडील स्वात जिल्ह्यातील रहिवासी घाबरून घराबाहेर पडले. भूकंपाचे हादरे पाकिस्तान आणि उत्तर-पश्चिम भारताच्या काही भागांत जाणवले.



पाकिस्तानातही धक्के

२४ तासांत पाकिस्तानात चार भूकंपाचे धक्के जाणवले, सर्वात तीव्र धक्का ५.५ रिश्टर स्केलचा होता. हा धक्का शनिवारी सकाळी ८:३६ वाजता जाणवला. त्याचे केंद्र जमिनीखाली ४० किलोमीटर खोलीवर बलुचिस्तान भागात जाणवला.

भारतीय उपखंडात गेल्या २४ तासांत भूकंपांचे सत्र

याआधी २७ जून रोजी सकाळी ११. ३८ वाजता भारताच्या हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात ३.२ रिश्टर स्केलचा कमी खोलीवरील भूकंप नोंदवला गेला. भूकंपाचा उगम ५ किमी खोलीवर झाला होता आणि त्याचा केंद्रबिंदू भूकंपप्रवण हिमालयाच्या पट्ट्यातील धरमशालेपासून सुमारे २२ किमी उत्तर-उत्तर-पश्चिम दिशेला होता.

लश्कर-ए-तोयबाच्या टॉप कमांडरचा संशयास्पद मृत्यू

◆ इस्लामाबाद (वृत्तसंस्था) :

लश्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर गाझी मुमताजचा संशयास्पद अवस्थेत मृत्यू झाला आहे. गाझी मुमताज दीर्घ काळापासून जम्मू काश्मीरमध्ये सक्रीय होता.

भारतीय सुरक्षा दलाच्या कारवाईला घाबरून तो पाकिस्तानमध्ये पळाला होता. तेव्हापासून गाझी आयएसआयच्या संरक्षणात राहत होता.

गाझी मुमताजने भारतात लश्कर-ए-तोयबाचा दहशतवादी म्हणून काम केले होते. त्यासाठी लश्कर-ए-तोयबाने त्याला गाझी खिताब दिला होता. त्यानंतर गाझी मुमताज नावाने त्याची ओळख झाली. तो लश्कर-ए-तोयबाचा म्होरक्या हाफीज सईदचा अत्यंत जवळचा मानला जायचा.

जपानवर दुहेरी चक्रीवादळांचा प्रहार !

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

जपानमध्ये हवामानाने अत्यंत धोकादायक वळण घेतले असून दोन एकापाठोपाठ आलेल्या शक्तिशाली चक्रीवादळांनी संपूर्ण जनजीवन विस्कळीत केले आहे. मुसळधार पाऊस व वेगवान वाऱ्यांमुळे निर्माण झालेली पूरस्थिती तसेच भूस्खलनाचा मोठा धोका लक्षात घेता जपानच्या हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने १० लाख नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याचे आवाहन केले असून आणीबाणीचा इशाराही देण्यात आला आहे.



सरकारने जारी केलेल्या अधिकृत ॲडव्हायझरीनुसार, या चक्रीवादळाचा फटका वाहतूक व्यवस्थेला बसला आहे. मुसळधार पावसामुळे देशभरातील २०० विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अनेक हाय-स्पीड ट्रेन्स व स्थानिक रेल्वे सेवा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आल्या आहेत. रस्ते वाहतुकीवरही याचा प्रचंड परिणाम झाला आहे.

मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनाचा वाढता धोका

जपानच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीच्या भागात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. पुढील २४ ते ४८ तास अत्यंत महत्त्वाचे असून नद्या धोक्याच्या पातळीच्या वर वाहण्याची शक्यता आहे. डोंगररांगांच्या भागात मुसळधार पावसामुळे कडे कोसळणे किंवा भूस्खलन होण्याचा तीव्र धोका निर्माण झाला आहे. नद्यांच्या किनारी राहणाऱ्या लोकांना तातडीने घरे खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एकाच वेळी दोन चक्रीवादळांनी धडक दिल्यामुळे परिस्थिती गंभीर बनली असून, नागरिकांना विनाकारण घराबाहेर न पडण्याचा व सरकारी मदत केंद्रांच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

मुंबईत मोहरमच्या मिरवणुकीत विषारी कॅप्सूलचे सावट

१४ हजार ९०० विषारी कॅप्सूल जप्त; एक संशयित अटकेत

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबईतील भायखळा परिसरात मोहरमच्या मिरवणुकीमध्ये सामूहिक विषप्रयोगाचा कट मुंबई पोलिसांनी उधळून लावला आहे. पोलिसांनी साधारण १४ हजार ९०० विषारी कॅप्सुल जप्त केल्या आहेत. शिवाय एका संशयित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मोहरमच्या मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्या लोकांना औषधांच्या नावाखाली विषाने भरलेले कॅप्सूल वाटप सुरु होते. ही गोळी खाल्ल्यानंतर एकाला अस्वस्थ वाटू लागले आणि त्याला रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर हा प्रकार लक्षात आला. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

फैयाज प्रेमजी असे या संशयित आरोपीचे नाव असून तो मूळचा पुण्याचा रहिवासी आहे. या आरोपीने लोकांना पेनकिलर गोळ्या असल्याचे सांगून कॅप्सूल वाटण्यास सुरुवात केली. एका व्यक्तीने हे कॅप्सूल खाल्ल्यानंतर त्याला उलट्या व अस्वस्थतेचा त्रास सुरू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली. पोलिसांनी आरोपीकडून उंदीर मारण्याचे जहाल विष भरलेल्या १४ हजार ९०० कॅप्सूल जप्त केल्या आहेत.

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत या मोठ्या कटाचा पर्दाफाश झाला आहे. आरोपी फैयाज याने कबूल केले की, मोहरमच्या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणावर घातपात करण्यासाठी त्याने या विषारी कॅप्सूलचे वाटप केले होते. या घातपातासाठी त्याने एकूण ३० हजार कॅप्सूल तयार करण्याचे टार्गेट ठेवले होते, ज्यातील १४ हजार ९०० कॅप्सूल पोलिसांनी वेळेत जप्त केले.

आरोपीने तब्बल ५० किलो 'झिंक फॉस्फाईड' (उंदीर मारण्यासाठी वापरले जाणारे विष) मागवले होते आणि त्याने प्रत्येक कॅप्सूलमध्ये १-१ ग्रॅम विष भरले होते. पोलिसांनी त्याच्या राहत्या ठिकाणाहून हे ५० किलो झिंक फॉस्फाईड हस्तगत केले आहे.

भायखळा विभागाचे पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहरमच्या मिरवणुकीत एक संशयित व्यक्ती विनापरवाना कॅप्सूल विकत व वाटत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. पहाटे ४ वाजताच्या सुमारास एका व्यक्तीला उलट्या आणि तीव्र पोटदुखीचा त्रास झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ संशयिताला ताब्यात घेतले.

आरोपीचा पुण्यात रंगाचा व्यवसाय

या घटनेतील आरोपी फैयाज प्रेमजी हा पुण्यातील विमाननगर परिसरातील असून हा रंगाचा (पेंट) व्यवसाय करतो. विशेष म्हणजे, हा आरोपी २०२५ मध्ये इराण आणि इराक येथे जाऊन आला होता, त्यामुळे त्याचा तिथं जाण्याचा मुख्य उद्देश काय होता आणि या कटामागे कोणती मोठी संघटना आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत. पोलिसांनी वेळेत कारवाई केल्यामुळे एक खूप मोठी जीवितहानी आणि भयानक दुर्घटना टळली आहे. आता त्या आरोपीची पुढील चौकशी सुरू आहे", अशी माहिती देखील पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितली आहे.

२०२७ च्या सुरुवातीला ट्रम्प यांचा भारत दौरा?

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २०२७ च्या सुरुवातीला भारताचा दौरा करणार आहेत, अशी माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी दिली. दोन्ही देश दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला व्यापारी करार अंतिम करण्यासाठी व ऊर्जा, संरक्षण, तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील असतानाच या दौऱ्याचे नियोजनाला गती मिळाल्याचे समोर आले आहे.

भारताकडून होणाऱ्या आयातीवर अमेरिकेने ५० टक्क्यांहून अधिक शुल्क लादल्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. सर्जिओ गोर हे भारतात गेल्या सहा महिन्यांपासून दौऱ्यावर होते. ते नुकतेच मायदेशी परतले. त्यावेळी ते म्हणाले की, राष्ट्राध्यक्षांच्या या दौऱ्याची तयारी आधीच सुरू झाली आहे. ट्रम्प आणि मोदी यांचे संबंध हे दोन्ही देश एकत्र मिळून जे काही उभारत आहेत त्याचा मुख्य पाया आहे, असेही ते म्हणाले. वॉशिंग्टन आपल्या सर्वात महत्त्वपूर्ण भागीदारींपैकी एक असलेल्या या संबंधांना अधिक मजबूत करण्यासाठी पावले उचलत असताना, परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ या द्विपक्षीय अजेंड्याला पुढे नेण्यात गुंतलेले आहेत, असे गोर यांनी सूचित केले.